| **रे.मु.नं.७९०/२०२३ मधील निशाणी क्र.१४ खालील आदेश**<br>**सविता चौधरी विरुध्द शिवाजी ब–हाटे वगैरे** | MHAH140011192023 |
| --- | --- |

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ याच्याविरुध्द झालेला विनाकैफीयत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत प्रतिवादीचे शपथपत्र जोडलेले आहे.

२. प्रतिवादीने सदर अर्जात कथन केले आहे की, त्यास दावा मिळकतीबाबत महत्वाची कागदपत्रे व माहिती उशिरा मिळाल्यामुळे तो मुदतीत दाव्याची कैफियत सादर करु शकला नाही. त्यामुळे दिनांक ११/०१/२०२४ रोजी त्याच्याविरुध्द विनाकैफियत आदेश पारित करण्यात आला. प्रस्तुत दावा वाटप व निरंतर ताकिद मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकतीशी प्रतिवादीचे हितसंबंध गुंतलेले असल्याने त्याची कैफियत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादीविरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळावी.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज खोटा असून प्रतिवादीने जाणुन बुजुन वेळेत कैफियत दिली नाही. सदरचा अर्ज न्यायालयाची वेळे घालवण्यासाठी व वादीस विनाकारण त्रास देण्यासाठी दिलेला आहे. सबब, जास्तीत जास्त दंड आकारण्यात यावा.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जात कागदपत्र व माहिती न मिळाल्याने मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही असे कारण नमुद केले आहे. परंतु, सदर कारणाच्या पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. असे असले तरी

देखील प्रस्तुत दावा हा वाटप व निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. त्यामुळे दावा पुर्णतः निकाली काढणेकरीता दोन्ही बाजुंचे म्हणणे व पुरावा अभिलेखावर असणे आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादीला त्याचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे योग्य ठरेल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र.१ याच्या विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश दंडासह रद्द करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ याने वादीला दंडापोटी रक्कम रुपये ५००/–(रक्कम रुपये पाचशे फक्त) दयावेत. तद्नंतर प्रतिवादी क्र.१ ची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2024.10.14 17:33:19 +0530

(**संध्या यु. सुळ**)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नेवासा

ठिकाण– नेवासा
दिनांक – १४/१०/२०२४